# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग**
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**जा.क्र.मनपा/अवि/ २९५ /2025-26** **दि. २७ / ०५/2025**

**// कार्यालयीन आदेश //**

विषय :- जुन्या/मोडकळीस आलेल्या अति धोकादायक इमारतीबाबत.

जुन्या/ मोडकळीस आलेल्या अति धोकादायक इमारतींवर पावसाळ्यापूर्वी करावयाची कार्यवाही करणेकरीता सर्व प्रभागाचे सहा. आयुक्त यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

| |
|---|
| 1) सी-1 प्रवर्गातील अति धोकादायक इमारतीच्या दर्शनी भागावर मोठ्या अक्षरात "सदरची इमारत धोकादायक असल्यामुळे त्यामध्ये कोणीही प्रवेश करु नये याबाबत फलक" लावण्यात यावेत. सदरचे फलक सुरक्षित जागेत लावण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर इमारती सभोवताली तात्पुरती कुंपण/ Barricading करावे. |
| 2) सी-1 प्रवर्गातील अति धोकादायक इमारतींचे मालक/ सदनिकाधारक यांना त्यांच्या ताब्यात असलेले चटई क्षेत्र संबंधात एरिया सर्टिफिकेट व ॲसेसमेंट उतारा देणेबाबत प्रभागातील व नगररचना विभागाचे उप-अभियंता / शाखा अभियंता तसेच संबंधीत कर निरिक्षक यांची समिती स्थापन केली आहे. संबंधीत अति धोकादायक इमारतींचे एरिया सर्टिफिकेट व ॲसेसमेंट उतारा देणेबाबत सदर समितीस कळविण्यात यावे. सदरचे एरिया सर्टिफिकेट व ॲसेसमेंट उतारा इमारत धारकांस देणेबाबत सदर समितीने त्वरीत कार्यवाही करावी. |
| 3) अतिधोकादायक इमारतीमधील नळ जोडण्या व वीज खंडीत करणे आवश्यक असल्यास अशा इमारतीची यादी शहर अभियंता यांचेकडे देण्यात यावी. |
| 4) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अति धोकादायक इमारती निष्कासित करणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने मे. अन्नपूर्णा कंस्ट्रक्शन या ठेकेदारास नियुक्त केले आहे. त्याअनुषंगे अति धोकादायक इमारती निष्कासित करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तोडक कामाचे अंदाजपत्रक तयार करून इमारत निष्कासित करणेची कार्यवाही करावी. |
| 5) महानगरपालिकेच्या पॅनलवरील बांधकाम अभियंता यांचेकडून जुन्या/ जीर्ण इमारतींच्या बाबतीत सदरची इमारत ही सी-2ए, सी-2बी, सी-3 या प्रवर्गात मोडत असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यास संबंधीत इमारतीचे मालक/ भोगवटाधारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 265 (अ)(5) नुसार इमारत दुरुस्त करुन स्थैर्यता प्रमाणपत्र सादर करण्याचे लेखी निर्देश द्यावेत. |

6) मा. उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र.1135/2014 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे धोकादायक/ मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतीतील रहिवाश्यांना स्थलांतरीत करण्याची जबाबदारी पोलीस विभागाची आहे. हे लक्षात घेवून पोलीस विभागाशी समन्वय साधून संयुक्त कार्यवाही करावी.

वरील सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1) सहा. आयुक्त
प्रभाग क्र.1, 2, 3, 4, 5 व 6

2) उप- अभियंता,
प्रभाग क्र.1, 2, 3 व
प्रभाग क्र. 4, 5, 6

3) सर्व उप-अभियंता / शाखा अभियंता
नगररचना विभाग व
अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग

4) सर्व कर निरिक्षक

प्रत :-

1) अतिरिक्त आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)
2) प्र. अतिरिक्त आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन)
3) उप-आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)
4) शहर अभियंता
5) सहा. संचालक, नगररचना
6) माहिती व तंत्रज्ञान विभाग, संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता